**MHKO100010712022**

संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ३५० /२०२२ **मधील नि.१ वरील आदेश**

फिर्यादीतर्फे अधिकृत इसम व त्यांचे विधीज्ञ हजर. फिर्यादी तर्फे अधिकृत इसम यांनी निशाणी १८ येथे पुरसीस दाखल करुन असे कळविले आहे की, फिर्यादी बँकेस चेक रक्कमेपैकी रू. १५,०००/- मिळाले असून फिर्यादी बँकेला सदरची केस पुढे चालवायची नाही. सबब सदरची केस निकाली काढणेत यावी. सबब फिर्यादी निशाणी १८ वरील पुरसीसप्रमाणे प्रकरण काढून घेणेस पात्र ठरतात. परिणामतः खालील प्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

<u>आदेश</u>

१. प्रकरण निशाणी १८ वरील पुरसीसप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येत आहे.

२. आरोपी यांना चलनक्षम दस्तऐवज कायदा कलम १३८ अन्वयेच्या अपराधातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५७ अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

३. आरोपीचा जामीनकदबा रद्द करण्यात येत आहे.

४. नियमानुसार फिर्यादी यांना न्यायालयीन शुल्क परत करण्यात यावे.

५. प्रकरण निकाली करणेत येत आहे.

Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2025.02.05 17:21:37 +0530

दिनांक ०५.०२.२०२५

डी. एम. पवार
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(कोर्ट क्र. २), गडहिंग्लज